महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेची महिला कौशल्यवृद्धी कार्यशाळा!

भिवंडी , दि. २० (वार्ताहर) : महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी आणि उद्योजकतेसाठी प्रेरणा देणारी "महिला कौशल्यवृद्धी कार्यशाळा" मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने दि. १९ जून २०२५ रोजी महापालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आले. या कार्यशाळेचे आयोजन नीती आयोग आणि Woman Entrepreneurship Platform (WEP) यांच्या संयुक्त सहकार्याने करण्यात आले.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली व शहर अभियंता दपिक खांबीत यांच्या उपस्थितीत झालेल्या या उपक्रमाला महिला वर्गाचा उत्स्फूर्द प्रतिसाद लाभला.

महिलांना उद्योजक करताना आर्थकि साक्षरता म्हणजे पैशाचे योग्य व्यवस्थापन करण्याचे ज्ञान आणि कौशल्याचे प्रशिक्षण, व्यवसाय वृद्धीसाठी दिशा आणि आर्थिक साक्षरतेचा लाभ मिळावा या हेतूने WEP, TransUnion CIBIL आणि Microsave Counselling या संस्थांनी मार्गदर्शन सत्र घेतले. 'फराळ सखी या महापालिकेच्या यशस्वी उपक्रमातील महिलांनीही विशेष सहभाग नोंदवला.

कार्यशाळेत सहभागी महिलांनी व्यवसाय करताना येणाऱ्या अडचणी, आर्थिक नियोजन, कर्ज सल्ला अशा विविध विषयांवर प्रश्न उपस्थित केले. नीती आयोग व WEP प्रतिनिधींनी त्यांच्या शंकांचे सविस्तर समाधान करत चर्चासत्र अधिक प्रभावी बनवले.

या उपक्रमानंतर बोलताना आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी सांगितले, "महिलांचा आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरण हा राष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे. 'फराळ सखी' प्रमाणेच अशा नवकल्पनांनी युक्त उपक्रमांची मालिका भविष्यात राबवली जाणार आहे." तसेच नीती आयोग व WEP चे आभार मानून, उपस्थित महिलांना त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्रातील स्टार्टअप्सना मिळणार गुगलचे बळ

मुंबई, दि. २० (प्रतिनिधी): राज्यात अधिकाधिक उद्योजक तयार व्हावेत यासाठी राज्य सरकारकडून मागील काही वर्षांपासून स्टार्टअप्सना प्राधान्य दिले आहे. त्याचधर्तीवर आता राज्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) स्टार्टअप्सना अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने पावले उचलली आहेत. त्यानुसार कृत्रिम बुद्धिमत्ता स्टार्टअप्सना माहिती क्षेत्रातील जागतिक कंपनी असलेल्या गुगलचे बळ मिळणार आहे. गुगलच्या माध्यमातून या स्टार्टअप्सना उद्योगासाठी जगाच्या कानाकोपऱ्यात संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे भविष्यात भारतातील स्टार्टअप्सना नवीन संधी उपलब्ध होण्याबरोबरच त्यांना जागतिक ओळख मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

महाराष्ट्रातील स्टार्टअप्सना जागतिक स्तरावर नेण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा प्रयत्नशील आहेत. या अनुषंगाने माहिती क्षेत्रातील अग्रगण्य जागतिक कंपनी गुगलच्या सहकार्याने महाराष्ट्रात उद्योगाच्या नव्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु आहे. गुगलच्या व्हेंचर कॅपिटल अँड सेटअप पार्टनरशिप विभागाचे प्रमुख डॉ. अपूर्व चॅमरिया यांनी मंगलप्रभात लोढा यांची नुकतीच भेट घेऊन याबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी कौशल्य विभागाचे आयुक्त लहुराज माळी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे बैठकीला उपस्थित होते.

जगातल्या नऊ देशात गुगलद्वारे एआय प्रशिक्षण केंद्र चालविण्यात येत आहेत. स्टार्टअप्साठी भारतातही अशाप्रकारचे केंद्र सुरू करण्याचे गुगलकडून नियोजन करण्यात येत असल्याची माहिती यावेळी डॉ. अपूर्व चॅमरिया यांनी दिली. निवड प्रक्रियेद्वारे उत्कृष्ट ठरणाऱ्या स्टार्टअप्सना यात संधी मिळणार आहे.

मध्य रेल्वेकडून आंतरराष्ट्रीय योग दिनापूर्वी चर्चासत्राचे आयोजन

मुंबई, दि. २० (प्रतिनिधी) : ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पूर्वसंध्येला, मध्य रेल्वेने आज, २०.०६.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथे योगच्या फायद्यांवर एक चर्चासत्र आयोजित केले होते. मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक श्री प्रतीक गोस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या चर्चासत्रात वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

रेल्वे बोर्डाने जारी केलेल्या निर्देशांनुसार, २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मध्य रेल्वे मुख्यालय आणि त्याच्या सर्व विभागांमध्ये योगाशी संबंधित उपक्रमांचे नियोजन आणि आयोजन यावर चर्चा करण्यात आली.या चर्चासत्राचा एक भाग म्हणून, मुंबईतील महिला पतंजली योग समितीच्या योग स्वयंसेवकांनी दिग्दर्शित केलेल्या योग सत्रात अतिरिक्त महाव्यवस्थापक, अधिकारी आणि कर्मचारी देखील सहभागी झाले होते.

११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मध्य रेल्वे २१ जून २०२५ रोजी विविध उपक्रम राबविण्यास सज्ज आहे.

आता साप्ताहिक सुट्टीच्या दिवशीसुध्दा मालमत्ताकर भरणा काऊंटर्स सुरू राहणार!

नवी मुंबई, दि. २० (वार्ताहर) : नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ताकर विभागाने पहिल्या तिमाहीमध्ये मालमत्ताकराच्या सामान्य करावर १० टक्क्यांची सवलत जाहीर केली आहे. मालमत्ता धारकांना वेळमध्ये कराचा भरणा करता यावा यादृष्टीने विभागाने ऑनलाईन सुविधासुध्दा सुरू केली आहे. यामध्ये मालमत्ता धारक महानगरपालिकेची वेबसाईट www.nmmc.gov.in यावरून तसेच My NMMC या ॲपवरून तसेच डेबिट कार्ड, क्रेडिट कार्डवरून अथवा जीपे, फोन पे, पेटीएम अशा विविध यूपीआय सुविधांव्दारे आपला मालमत्ताकर घरबसल्या अगदी सहजपणे ऑनालाईन भरू शकतात.

त्यासोबतच ज्या नागरिकांना कॅश काऊंटर्समध्ये जाऊन कराचा भरणा करावयाचा आहे अशा मालमत्ता धारक नागरिकांच्या सोयीसाठी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशीसुध्दा कर भरणा काऊंटर्स सुरू ठेवण्याचा निर्णय महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी घेतला आहे. त्याप्रमाणेच येत्या शनिवार दि. २१ व रविवार दि. २२ जून आणि पुढील आठवड्यातील शनिवार २८ जून व रविवार दि. २९ जून २०२५ रोजी, सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत मालमत्ताकर भरणा काऊंटर्स सुरू राहणार आहेत.

नागरिकांना मालमत्ता कर भरण्यामध्ये वेळेची अडचण येऊ नये व सवलतीचा लाभ घेता यावा यासाठी ही सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासोबतच नागरिकांना ऑनलाईन करभरणा करून सामान्य करावर जाहीर करण्यात आलेल्या १०% सवलतीचा लाभ ३० जूनपर्यंत घेता येणार आहे याची नोंद घेण्याचे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

एल अँड टीची 'भूमिका' संशयास्पद!

एल अँड टीचा एमएमआरडीएच्या पत्राला प्रतिसाद नाही

मुंबई, दि. २० (प्रतिनिधी) : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) लार्सन ॲण्ड टुब्रो (एल अँड टी) या दिग्गज अभियांत्रिकी कंपनीला दिलेल्या अधिकृत पत्राला ९ दिवस उलटूनही कुठलाही प्रतिसाद न मिळाल्यामुळे, सार्वजनिक प्रकल्पांच्या पारदर्शकतेविषयी पुन्हा प्रश्न उपस्थित होत आहेत.

१० जून रोजी एमएमआरडीएने ई-मेलद्वारे एल अँड टीला पत्र पाठवून, त्यांनी सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या अंदाजित खर्च आणि दरपत्रकासह पूरक कागदपत्रांची प्रत मागितली होती. या उत्तरासाठी सात कामकाजाचे दिवस दिले गेले होते. मात्र १९ जूनपर्यंत एल अँड टीने कोणतीही माहिती सादर केलेली नाही. विशेष म्हणजे, हाच एल अँड टी न्यायालयात भरभरून आकडे सादर करत होता.या साऱ्या प्रक्रियेचा केंद्रबिंदू ठरलेला आहे ते गायमुख ते फाउंटन हॉटेल जंक्शनदरम्यानचा बोगदा प्रकल्प आणि त्यानंतर फाउंटन ते भायंदरपर्यंतचा उन्नत रस्ता. यासाठी एल अँड टीने अनुक्रमे ६,४९८ कोटी आणि ५,५५४ कोटींच्या बोली लावल्या होत्या, असं त्यांनीच न्यायालयात स्पष्ट केलं होतं. मात्र ही निविदा प्रक्रिया न्यायप्रविष्ट झाल्यानंतर एमएमआरडीएने सार्वजनिक हिताचा मुद्दा मांडत संपूर्ण प्रक्रिया रद्द केली आणि नव्याने टेंडर प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेतला.

सर्वोच्च न्यायालयानेही एल अँड टीच्या याचिकेला "निरर्थक" ठरवत त्यांना दिलासा नाकारला. त्यामुळे एमएमआरडीएने आता पुन्हा निविदा प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर, एल अँड टीने कोर्टात दिलेले आकडे अधिकृत स्वरूपात सादर करावेत, अशी मागणी केली आहे. ही माहिती 'टेंडर रिव्ह्यू कमिटी'कडे दिली जाणार असून, तज्ज्ञांच्या मदतीने इतर बोलीदारांसोबत तुलनात्मक विश्लेषण केले जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर एमएमआरडीएचे एक वरिष्ठ अधिकारी म्हणाले, "उत्तर आल्यानंतर सादर केलेली माहिती तपासून नवीन अंदाजपत्रक तयार केले जाईल. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि न्याय्यतेवर आधारित ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे."

एल अँड टीला याआधी 'नॉन-रेस्पॉन्सिव्ह' घोषित करण्यात आले होते. त्यामागील कारणंही गंभीर होती — तेलंगणातील मेडिगड्डा बॅरेज दुर्घटनेबाबत माहिती लपवणे, निविदा प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रांचा अभाव इत्यादी. ही बाब उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली होती.

याच कंपनीच्या प्रकल्पांशी संबंधित गेल्या काही वर्षांतील अपघातांची यादीही चिंतेची बाब ठरते. चेन्नई मेट्रो, बुलेट ट्रेन, वसई पाणी प्रकल्प, कोयंबतूर बायपाससारख्या ठिकाणी घडलेले अपघात, कामगार मृत्यू आणि दंडाची प्रकरणं ही केवळ आकडेवारी नसून एक प्रकारचा इशाराच आहेत.

सार्वजनिक संस्थांनी जर पारदर्शक निर्णय घेतले, तर खासगी कंपन्यांनीही त्याला योग्य प्रतिसाद देणे अपेक्षित आहे. एल अँड टीने न्यायालयात उत्साहाने मांडलेली आकडेवारी जर खरीच होती, तर ती एमएमआरडीएच्या पत्रानंतर अधिकृतपणे का सादर केली जात नाही, हा प्रश्न आता अनुत्तरित आहे.

ऐरोली विभागातील अनधिकृत शेडवर अतिक्रमण विभागामार्फत कारवाई

नवी मुंबई, दि. २० (वार्ताहर) : नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने जी विभाग ऐरोली अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात अनधिकृत शेडवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ऐरोली विभाग अंतर्गत ऐरोली येथील शिवार धाबा व साई कुटीर धाबा यांनी तात्पुरते शेड उभारण्यात आलेले होते. सदरचे अनधिकृत शेड नमुंमपाच्या कारवाई अंतर्गत निष्कासित करण्यात आले आहे.

या धडक मोहिमेसाठी १ जेसीबी व ०७ मजूर यांचा वापर करण्यात आलेला असून मोहिमेकरीता जी विभाग ऐरोली येथील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

उच्च न्यायालयानं घेतला रेल्वेचा समाचार! रोजचे १० मृत्यू रोखण्यासाठी काय करणार हे स्पष्ट करण्याचे दिले आदेश

मुंबई, दि. २० (प्रतिनिधी) : मध्य रेल्वेवरील मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ गेल्या ९ जून रोजी लोकलमधून पडून झालेल्या मृत्यूंबाबत उच्च न्यायालयाने शुक्रवारी गंभीर चिंता व्यक्त केली. तसेच, लोकल प्रवासादरम्यान विविध कारणांनी होणाऱ्या मृत्यूंची संख्या गेल्या १५ वर्षांत ४६ टक्क्यांनी कमी झाल्याचा दावा रेल्वे प्रशासन करत असले तरी दिवसाला दहा प्रवाशांचा मृत्यू होणे हे चिंताजनक असल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले. त्याचप्रमाणे, भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, असे बजावताना लोकलमधून पडून होणारे मृत्यू कसे रोखणार, त्यासाठी काय उपाययोजना करणार आणि त्यांची अमलबजावणी कधीपर्यंत करणार, हे स्पष्ट करण्याचे आदेश न्यायालयाने रेल्वे प्रशासनाला दिले. उपाययोजनांची अंमलबजावणी केली जाते की नाही यावर न्यायालय देखरेख ठेवेल, असेही न्यायालयाने यावेळी प्रामुख्याने स्पष्ट केले.

लोकल प्रवासादरम्यान विविध कारणांनी होणारे मृत्यू रोखण्यासाठी गेल्या काही वर्षांत अनेक परिणामकारक उपाययोजना केल्या गेल्या आहेत आणि केल्या जात आहेत, असा दावा रेल्वे प्रशासनाने केला. त्यावर, मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने रेल्वे प्रशासनाने यापूर्वी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राचा दाखला दिला. त्यात रेल्वे प्रशासनाने एकीकडे लोकल प्रवासादरम्यान होणाऱ्या मृत्यूंची संख्या कमी होत असल्याचा दावा करण्यात केला होता. त्याचवेळी, गेल्या वर्षी लोकल प्रवासादरम्यान ३५८८ प्रवाशांचा विविध कारणांनी मृत्यू झाल्याची कबुली दिली होती. प्रतिज्ञापत्रातील दाव्यांच्या विसंगतीवर न्यायालयाने बोट ठेवले. तसेच, दिवसाला १० प्रवाशांना लोकल प्रवास करताना जीव गमवावा लागत असेल तर ही चिंताजनक स्थिती आहे, असे न्यायालयाने सुनावले. तसेच, मुंब्राच्या घटनेची पुनरावृत्ती होणार नाही आणि लोकलमधून पडून मृत्यू होणार नाही यासाठी काय करणार, असा प्रश्न न्यायालयाने केला.

प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शिफारशी सुचवण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आल्याची, तर मुंब्रा येथील घटनेच्या चौकशीसाठी शिस्तपालन समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनातर्फे यावेळी न्यायालयाला देण्यात आली. त्यावर लोकसमधील गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि मुंब्रासारख्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नयेत यासाठी सामान्य लोकलला स्वयंचलित दरवाजे का बसवले जात नाहीत, असा प्रश्न देखील न्यायालयाने रेल्वे प्रशासनाला केला. या वेळी या समितीतील सदस्यांच्या पात्रततेबाबत याचिकाकर्त्यांनी आक्षेप घेतला व हे सदस्य तज्ज्ञ नसल्याचा दावा केला. त्यावर, या समितीतील सदस्यांची पात्रता उघड करा आणि याचिकाकर्त्यांनी मृत्यू रोखण्यासाठी सुचवलेल्या शिफारशीही विचारात घेण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.

शेअर सर्टिफिकेट हरवल्याची सूचना

सूचना येथे देण्यात येते की, कार्यालय क्रमांक बी-२०९, ग्रेस प्लाझा शॉपिंग प्रिमायसेस को-ऑप सोसायटी लिमिटेड, एस. व्ही. रोड, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई ४०० १०२, प्रमाणपत्र क्रमांक २५ असलेले, यांचे शेअर सर्टिफिकेट हरवले आहे आणि ते सापडत नाही. डुप्लिकेट सर्टिफिकेट जारी करण्यासाठी सोसायटीकडे अर्ज केला जात आहे. तसेच संदर्भ क्रमांक ३५९२५-२०२५ अंतर्गत मुंबई पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याबाबत कोणताही दावा किंवा आक्षेप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला या सूचना जारी झाल्यापासून १४ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अधोस्वाक्षरीकर्त्याला कळवावे अशी विनंती आहे, अन्यथा डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट जारी केले जाईल आणि त्यानंतर कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही.

नाव : सलीम शेख
को-ग्रेस प्लाझा शॉपिंग प्रिमायसेस
को-ऑप सोसायटी लिमिटेड
संपर्क : ९७७३५७३७७७
दिनांक : १८-०६-२०२५
ठिकाण : मुंबई

मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
निविदा सूचना

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि करिता मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक एसयूआर/ एल/टी/ २०२४/ १३आर. **कामाचे नाव:-** सोलापूर येथील विभागीय अभियांत्रिकी प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामासंदर्भातील विद्युत सामान्य सेवा भाग. (पुनर्निमंत्रण) **अंदाजे किंमत:** रु. ११,४०,००९.४४/- **बोली सुरक्षा:-** रु. २२,८००/- **पूर्ण कालावधी:-** ०६ महिने **ऑफरची वैधता:-** ६० दिवस निविदा क्रमांक एसयूआर/एल/टी/२०२४/४८आर. **कामाचे नाव:-** सोलापूर विभागातील सोलापूर स्टेशनवरील ७ प्रकारच्या प्रकार-२ निवासी निवासी निवासस्थानांच्या बांधकामासंदर्भातील विद्युत सामान्य सेवा भाग. (पुनर्निमंत्रण) **अंदाजे खर्च:-** रु. ७२,२४,८२९.७६/- **बोली सुरक्षा:-** रु.१,४४,५००/- **पूर्ण कालावधी:-** ०९ महिने **ऑफरची वैधता:-** ६० दिवस वेबसाइटवर **निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:-**१५/०७/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता. बोली सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरावा लागेल.

ANJ-56

तिकिटांसाठी यूटीएस एप डाउनलोड करा

सार्वजनिक सूचना

लक्षात घ्या की, **श्री. नागराज पुखराज जैन, हे खालील निर्देशित अनुसूचीमध्ये विवरणीत फ्लॅट संबंधात परिपूर्ण मालक/ ताबाधारक/ जप्तीकर्ता व सभासद** आहेत. त्यांनी मूळ वाटपधारक श्रीम. प्रभा मनोहर खारवाड यांच्याकडून संदर्भित फ्लॅट खरेदी केला आहे. म्हाडाचे मूळ वाटपधारक जे म्हाडाचे होते, त्यांचे नाव म्हाडा आणि एन.एन. यशोदीप सीएचएस यांच्यात अंमलात आणलेल्या आणि नोंदणीकृत विक्री करारात समाविष्ट असलेल्या सोसायटीच्या सदस्यांच्या यादीत नमूद केले आहे. म्हाडाने श्री. प्रभा मनोहर खरवाड यांना जारी केलेले मूळ वाटप/ऑफर/हस्तांतरण पत्र हरवले आहे, हरवले आहे आणि आजपर्यंत सापडत नाही. उर्वरित सर्व आवश्यक कागदपत्रांवरून असे दिसून येते की श्री. नागराज पुखराज जैन आजपर्यंत सदर फ्लॅट परिसराचे पूर्ण मालक, भोगवटादार, मालक आणि सदस्य आहेत.

आता **श्री. नागराज पुखराज जैन** सदर फ्लॅट **(१) श्री. अक्षय अनुप राठोड व (२) श्री. प्रतीक अनुप राठोड** यांना विक्री/हस्तांतरण करू इच्छितात.

कोणत्याही व्यक्ती/फर्म/कंपनीला वारसा, हिस्सा, विक्री, गहाणखत, भाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, भेटवस्तू, ताबा किंवा भार यासारख्या कोणत्याही प्रकारे किंवा अन्यथा कोणताही दावा किंवा अधिकार असल्यास, त्यांनी या सूचना प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत त्यांच्या/तिच्या/तिच्या अशा दाव्याची, जर काही असेल तर, सर्व सहाय्यक कागदपत्रांसह माहिती देणे आवश्यक आहे, अन्यथा अशा दाव्याचा संदर्भ न घेता सदस्यत्व हस्तांतरण पूर्ण केले जाईल आणि अशा व्यक्तीचे दावे, जर काही असतील तर, माफ केले गेले आहेत असे मानले जातील आणि माझ्या क्लायंट आणि सध्याच्या विक्रेत्यावर बंधनकारक नाहीत.

मालमत्तेचे वेळापत्रक

फ्लॅट क्रमांक ६८१, १ ला मजला, इमारत क्रमांक २६, नेहरू नगर यशोदीप सहकारी गृहनिर्माण संस्था लि., नेहरू नगर, कुर्ला (पूर्व), मुंबई-४०००२४

दिनांक : २१-०६-२०२५ एस. बी. घोरपडे
वकील उच्च न्यायालय
पत्ता : इमारत क्रमांक ११५ च्या मागे, सानिध्या जिमच्या शेजारी, नेहरू नगर, कुर्ला (पूर्व), एम-२४, दूर. : ९२२४३३९२९३.
Sunilghorpade_2012@yahoo.com

शुद्धिपत्रक सूचना

एडलवाईस असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड
सीआयएन : U67100MH2007PLC174759
नोंदणीकृत कार्यालय : एडलवाईस हाऊस, १ ला मजला, ऑफ सीएसटी रोड, कलिना, मुंबई ४०० ०९८.

स्थावर मालमत्तेच्या ई-लिलावासाठी सार्वजनिक सूचना या संदर्भात दिनांक **१९.०६.२०२५** रोजी या वृत्तपत्रात **प्रकाशित झालेल्या जाहिरातीच्या संदर्भात. कर्जदार वीट्राग ट्रॅव्हल्सच्या खात्यात (कर्ज खाते क्रमांक १०२एमएसएम००१०३२७८१+ १०१एमएसएम००१०२१२९०), कृपया मालमत्तेच्या वर्णनात ८१४ चौरस फूट** ऐवजी ८.१४ चौरस मीटर कार्पेट क्षेत्रफळ आहे हे वाचा. इतर सर्व तपशील अपरिवर्तीत राहील.

प्राधिकृत अधिकारी
एडलवाईस असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड
(ईएआरसी ट्रस्ट एससी ४३५ चे विश्वस्त)
तारीख : २१.०६.२०२५
ठिकाण : मुंबई

फॉर्म ए - जाहीर घोषणा
(भारतीय दिवाळखोरी व कर्जबाजारीपणा (कॉर्पोरेट व्यक्तीकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अंतर्गत)

लुधियाना तालवांडी टोल रोड्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या धनकोचे लक्ष केंद्रित करण्याकरिता

संबंधित विवरण		
१.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	लुधियाना तालवांडी टोल रोड्स प्रायव्हेट लिमिटेड
२.	कॉर्पोरेट ऋणकोची एकीकरण तारीख	२० डिसेंबर, २०१०
३.	कोणते कॉर्पोरेट ऋणको एकीकरण/नोंदणीकृत आहेत अशांचे प्राधिकरण	कंपनीचे निबंधक, मुंबई
४.	कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट आयडेंटिटी क्रमांक/ मर्यादित दायित्व आयडेंटिफिकेशन क्रमांक	U45203MH2010PTC211120
५.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व कॉर्पोरेट ऋणको यांचे प्रमुख कार्यालय (जर काही असल्यास)	पत्ता : ५१३/ए, ५ वा मजला, कोहिनूर सिटी, किरोळ रोड, एल.बी.एस. मार्ग, ऑफ वांद्रे कुर्ला संकुल, कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७०, महाराष्ट्र
६.	कॉर्पोरेट ऋणकोचे दिवाळखोरी प्रारंभ तारीख	१९ जून, २०२५
७.	दिवाळखोर ठराव प्रक्रिया अंतिम अंदाजित तारीख	१६ डिसेंबर, २०२५
८.	दिवाळखोरी विशेष कार्यरत असलेल्या अंतरिम ठराव व्यावसायिक यांचे नाव व नोदणीकरण क्रमांक	विक्रम कुमार नोंदणीकरण क्र. : आयबीबीआय/आयपीए-००१/ आयपी-पी०००८२/२०१७-२०१८/१०१७८
९.	मंडळाकडे नोदणीकृत असलेल्या अंतरिम ठराव व्यावसायिक यांचा पत्ता व ई-मेल	विक्रम कुमार सेक्टर बी-१/१७४८, वसंत कुंज, एमटीएनएल कार्यालयजवळ, नवी दिल्ली ११० ०७० ईमेल : vikramau@gmail.com
१०.	अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्यासह संबंधितांचा पत्ता व ई-मेल आयडी	विक्रम कुमार सेक्टर बी-१/१७४८, वसंत कुंज, एमटीएनएल कार्यालयजवळ, नवी दिल्ली ११० ०७० ईमेल : cirp.ludhiana.ttrpl@gmail.com
११.	दाव्यांच्या सादरीकरणाकरिता अंतिम तारीख	३ जुलै, २०२५
१२.	अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याद्वारे जारी मंजूर २१ च्या उप-अनुच्छेद (६ए) च्या खंड (बी) अंतर्गत जर काही असल्यास धनकोचे वर्ग	लागू नाही
१३.	वर्गामध्ये धनकोचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कायद्याच्या ओळखा असलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे)	लागू नाही
१४.	ए) संबंधित प्रपत्र व बी) उपलब्ध प्राधिकृत प्रतिनिधीचा तपशील	: ए. वेबलिंक : https://ibbi.gov.in/en/home/downloads प्रत्यक्ष पत्ता : लागू नाही

सूचना याद्वारे देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण यांनी **लुधियाना तालवांडी टोल रोड्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्या कॉर्पोरेट दिवाळखोर ठराव प्रक्रिया अनुसार आदेशान्वये प्रारंभ दि. १९ जून, २०२५ रोजी करण्याचे आदेश दिले आहेत.

लुधियाना तालवांडी टोल रोड्स प्रायव्हेट लिमिटेड यांचे धनको यांनी याद्वारे बाब क्र. १० संबंधात नमूद कॅम्प कार्यालय पत्ता येथे अंतरिम ठराव प्रोफेशनलकरिता दि. ०३ जुलै, २०२५ रोजी वा पूर्वी पुराव्यांसह त्यांचे दावे सादर करावे.

वित्तीय धनको यांनी केवळ ईलेक्ट्रॉनिक स्वरूपात त्यांचे दाव्यांचे पुरावे सादर करावे. सर्व अन्य धनको यांनी त्यांचे दाव्यांचे पुरावे व्यक्तीशः, पोस्टद्वारे वा ईलेक्ट्रॉनिक स्वरूपात सादर करावे.

सादरीकरण करण्यास अपयश तसेच दाव्यांचे चुकीचे पुरावे सादर केल्यास त्यावर दंड आकारण्यात येईल.

दि. २० जून, २०२५ (विक्रम कुमार)
ठिकाण : नवी दिल्ली
अंतरिम ठराव प्रोफेशनल
लुधियाना तालवांडी टोल रोड्स प्रायव्हेट लिमिटेड
नोंदणीकरण क्र. : आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०००८२/२०१७-२०१८/१०१७८
एएफए क्र. : एए१/१०१७८/०२/३११२२५/१०७७३९, वैधता ३१.१२.२०२५

सार्वजनिक सूचना

लक्षात घ्या की, **श्रीम. सुनंदा सावलाराम कदम हे खालील निर्देशित अनुसूचीमध्ये विवरणीत फ्लॅट संबंधात परिपूर्ण मालक/ ताबाधारक/ जप्तीकर्ता व सभासद** आहेत. त्यांनी जुना फ्लॅट क्र. ४५८५ त्यांची भाची श्रीम. सानिका अनिल कदम यांच्याकडून भेट करार नोंदणीकृत करून भेट दिला होता. श्रीम. सुनंदा सावलाराम कदम यांनी विशाल सीएचएस लि. चे सभासद म्हणून सादरीकरण केले आहेत, शेअर प्रमाणपत्र क्र. २४ चे शेअर क्र. ११६ ते १२० हे त्यांच्याद्वारे जारी केले होते. अस्थायी आवास योजना करार दि. २०.०३.२०२५ हे श्रीम. सुनंदा सावलाराम कदम विकासक यांच्यासह व सोसायटी नवीन फ्लॅट क्र. १००१ संबंधात अंमलात आणला आहे. उर्वरित सर्व दस्तावेज असे दर्शवत आहेत की, सदर फ्लॅट जागेच्या त्या परिपूर्ण मालक, सभासद, ताबाधारक आहेत.

आता, **श्रीम. सुनंदा सावलाराम कदम** हे सदर फ्लॅट **श्री. आशिष गोविंद लोखंडे** यांना विक्री/हस्तांतरण करू इच्छितात.

कोणत्याही व्यक्ती/फर्म/कंपनीला वारसा, हिस्सा, विक्री, गहाणखत, भाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, भेटवस्तू, ताबा किंवा भार यासारख्या कोणत्याही प्रकारे किंवा अन्यथा कोणताही दावा किंवा अधिकार असल्यास, त्यांनी या सूचना प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत त्यांच्या/तिच्या/तिच्या अशा दाव्याची, जर काही असेल तर, सर्व सहाय्यक कागदपत्रांसह माहिती देणे आवश्यक आहे, अन्यथा अशा दाव्याचा संदर्भ न घेता सदस्यत्व हस्तांतरण पूर्ण केले जाईल आणि अशा व्यक्तीचे दावे, जर काही असतील तर, माफ केले गेले आहेत असे मानले जातील आणि माझ्या क्लायंट आणि सध्याच्या विक्रेत्यावर बंधनकारक नाहीत.

मालमत्तेचे वेळापत्रक

फ्लॅट क्रमांक १००१ (जुना क्र. ४५८५), १० वा मजला, बिल्डींग क्र. १३६, प्रोजेक्ट ब्लिस, विशाल को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि. म्हणून, नेहरू नगर, कुर्ला (पू) मुंबई ४०० ०२४ येथील.

दिनांक : २१-०६-२०२५ एस. बी. घोरपडे
वकील उच्च न्यायालय
पत्ता : इमारत क्रमांक ११५ च्या मागे, सानिध्या जिमच्या शेजारी, नेहरू नगर, कुर्ला (पूर्व), एम-२४, दूर. : ९२२४३३९२९३.
Sunilghorpade_2012@yahoo.com

केनरा बैंक Canara Bank
भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking
एआरएम शाखा मुंबई, ४ था मजला, कॅनरा बँक इमारत, आदी मर्झबान स्ट्रीट, मुं